# पिकासोचें कबूतर

१९६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५७७

REFBK-0012750
REFBK-0012750

वामन नारायण देशपांडे

# पि का सो चें  क बू त र

# पिकासोचें कबूतर

वामन नारायण देशपांडे

REFBK-0012750
REFBK-0012750

किंमत तीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 12750

व्हीनस प्रकाशन : पुणें

प्रथमावृत्ति
सप्टेंबर १९६२

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार : पुणे २

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार : पुणे २

अनुक्रम ...
क्रमांक ... 75ЦЦ नों. दि. 13-11-82

# अनुक्रमणिका


| कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|
| १ मार्गप्रतीक्षा | १ |
| २ तोंडीस तोंड ! | २ |
| ३ इंद्रधनुष्य | ३ |
| ४ रूपगर्विता | ४ |
| ५ तोच गीत ऐकितो ! | ७ |
| ६ धुक्याआड | ८ |
| ७ पुंजीवाद्यांच्या देशांत | ९ |
| ८ अग्निमंदिर | १० |
| ९ चार मुक्तकें | १३ |
| १० झाडांचें गाणें | १४ |
| ११ भिंती | १७ |
| १२ बलिदान | १८ |
| १३ पोटासाठीं | २० |
| १४ उगम | २२ |
| १५ सहलींत | २३ |
| १६ अस्मिता | २४ |
| १७ मनांतलें सौंदर्य | २५ |
| १८ दुसरी शस्त्रक्रिया ( मुद्रण दोन स्तंभांत ) | ,, |
| १९ पांढरा मोर | २७ |
| २० गस्त ( मुद्रण दोन स्तंभांत ) | ,, |
| २१ निसर्ग आणि मानव | २९ |
| २२ वंचना | ३० |
| २३ अवस | ३१ |
| २४ शिकलगार | ३२ |
| २५ मातरिश्वा | ३३ |
| २६ प्रेमभक्ति | ३६ |
| २७ इतकेंच | ३७ |
| २८ सागर | ३८ |
| २९ जीर्ण गढी | ३९ |
| ३० तोरणाखालून | ४० |

| | | |
|---|---|---|
| ३१ | निःशब्दपणें | ४१ |
| ३२ | रंगांचें गाणें | ४२ |
| ३३ | त्यावेळीं असेन ! | ,, |
| ३४ | नवी भर | ४३ |
| ३५ | नीरवता ( मुद्रण दोन स्तंभांत ) | ४४ |
| ३६ | साफल्य | ४५ |
| ३७ | पिकासोचें कबूतर | ,, |
| ३८ | शंका | ५० |
| ३९ | धीरू धोबी | ,, |
| ४० | तुझ्यांतलें शाश्वत | ५२ |
| ४१ | ईदेचा चंद्र | ,, |
| ४२ | तित्तिरवाला | ५३ |
| ४३ | माझें सूफी मन | ५४ |
| ४४ | दडवलेली उंची ( मुद्रण दोन स्तंभांत ) | ५५ |
| ४५ | विनवणी | ५८ |
| ४६ | स्वप्नदर्शन | ५९ |
| ४७ | शेले | ६० |
| ४८ | अंतरींचा दिवा | ६१ |
| ४९ | कबीराचा शेला | ६२ |
| ५० | आकाशापैकीं | ६३ |
| ५१ | काळा-गोरा | ६५ |
| ५२ | प्लेटोची गुहा | ,, |
| ५३ | कवच | ६६ |
| ५४ | कारवा | ६७ |
| ५५ | देवमानव | ६८ |
| ५६ | कल्पतरूची इच्छा | ७२ |
| ५७ | मूर्तिकार असतों तर— | ७३ |
| ५८ | गाभाऱ्यांत | ,, |
| ५९ | रोम नगरींत ( मुद्रण दोन स्तंभांत ) | ७४ |
| ६० | नटराज | ७६ |
| | टीपा | ७७ |

# शुद्धिपत्र

[ किरकोळ मुद्रणदोष सहज लक्षांत येणारे असल्यानें येथें दिले नाहींत ]

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ११ | १६ | चदनाचें | चंदनाचें |
| ३५ | २१ | दोहोंचा | दोहोंची |
| ३६ | १२ | हा | हो |
| ४८ | २२ | .... ... | कवितेंतील ६७ व्या चरणाआधीं परिच्छेदाचा ४ हा आंकडा हवा. |
| ५८ | ( ' दडवलेली उंची, ' उजवीकडील स्तंभ, ओळ १२ ) | ... ... | स्पेस ( मोकळी जागा ) कवितेंतील ११३ व्या चरणानंतर नको, ११२ व्या चरणानंतर हवी |
| ५९ | १८ | स्वप्नदशन | स्वप्नदर्शन |
| ६७ | १७ | मूल्यें | मूल्य |
| ७३ | ३ | असल्या | असत्या |

## मार्गप्रतीक्षा

अनुक्रम 33438 वि: ......
क्रमांक 7500 नों दि 23-11-82

कां न तुझा रथ अजुनी थडकला नृपाला ?
वाट तुझी पाहुन रे जीव शिणुन गेला ! ध्रु०
झाला रवि अस्तंगत,
शुक्र गगनिं होत उदित;
एकलीच पथिं कुठवर राहूं मी बाला ? १
सांजेला रथिं जाशी,
प्रतिदिन तूं मज दिसशी,
आजच कां वेळ टळुन तुज उशीर झाला ?
आतुर मी दर्शनास :
रोज जिवा तोच ध्यास—
जरि ठसली हृदयिं तुझी मूर्ति चारुशीला ! ३
फूल निकट आणोनी
हुंगियलें चुंबोनी
तद्दर्शन परि न जेंवि होई नयनाला— ४
आपणास कीं आपण
जरि बघतों स्वप्नांतुन
आपुलेंच मुख न दिसे जेंवि आपणाला— ५
त्यापरि तूं नच दिससी
हृदयांतरिं जरि वससी;
निकटत्वें किति अद्भुत दूरपणा आला ! ६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92643

मन्मानस–कलहंसा !
सारुनिया हृत्कोषा
ये पुढतीं—ताधिं मदंत होवो जरि झाला ! ७

## तोडीस तोड !

आवडत्या निज सुमना बघुनी अपार होई मोद मनीं :
गुलाब भासे आपुलकीच्या आरुण उपनेत्रामधुनी !
अन्यासहि सुम सुखवो म्हणुनी दाखविलें ज्याला त्याला,
कां हे वानस्पतिक हांसती परस्परां घालुन डोळा ?
वदती, “ आम्हां कधीं न दिसला गुलाब ऐसा नवलाचा,
विश्वामित्री सृष्टीमधला गमे असावा हा तुमचा !
गुलाबापरी वर्ण न याचा, सौरभही तैसा नाहीं
गुलाब असुनी याच्या दैवीं नसती कां हो कंटकही ?
गमे गुलाबी काविळ बसली बीळ करुन तुमच्या नयनीं,
करा आपुली निर्मळ दृष्टी घेवोनी औषधपाणी ! ”

सगळे वानस्पतिक भासले जडबुद्धीचे मंदमती,
शास्त्राभ्यासें रसज्ञतेची हो पुरती माती-माती !
वृक्षांचीं वर्णनें वाचतों नव्या-जुन्या ग्रंथांतरिंचीं,
उडवुन देतों दैना आतां या साऱ्या जडभरतांची !
कलकत्त्याला, वटोदरेला अन् तंजावर नगरीस

पाठविले मीं विद्युद्वेगें अपुले विद्युत्संदेश.
मुद्रणभूषित, हस्तलिखितही आणि ताडपत्रांवरचे
ग्रंथांचे संभार पातले तेव्हां ठायींठायींचे.
पठण तयांचें झटुनी केलें करुन जागरण अलोचनः
— हा ! हा ! कां मज छळूं लागली भोंवळ ही चांडाळीण ?
शंका कसली ?– ग्रंथांनींही कट केला जडभरतांशीं,
कण्हेरिचीं वर्णनें त्यांतलीं जुळलीं माझ्या पुष्पाशीं !
कण्हेरच असो सुम हें माझें, पर्वा ती कसली मजला ?
निरंकुशत्व न परि कां देती मला फुलाच्या ब्रह्मयाला ?
कण्हेर माझा गुलाब म्हणुनी कां न शिरीं धरिते जनता ?
कण्हेर घडवी तया नसे कां गुलाब घडण्याची क्षमता ?

याच कण्हेरा पुटें तांबड्या रंगाचीं आतां देतों,
त्यावरतीं अत्तरें गुलाबी कनोजांतलीं शिंपडितों !
म्हणतील न कां गुलाब त्यातें मगहि जाणते महा-महा ?
—कंटक नसती, नसोत ! माझा कंटकविरहित गुलाब हा !!

## इंद्रधनुष्य

" नयनकमळ हे कैंचे ? हा केवळ रंग निळा !
रक्तिमाच हा !--मानूं अधर केंवि त्याला ?
देहलता ही कसली ? वर्ण खचित हा पिंवळा !

वद हिरवा रंग कधीं तव चुनडी झाला ?
इंद्रचाप तूं !–तुजला केंवि म्हणूं व्रजबाला ?
स्त्री सोडुन कोण युवा धनुला वश झाला ? ”

“ गोपि नसो मी नसलें ! कृष्ण तरी तूं कुठला ?
इंद्रचाप मज गणिशी तूंहि मेघ काळा !
जलदाविण इंद्रधनू कैसें गगनीं उमटे ?
चापाविण जलद मलिन हेंही नच खोटें !
प्रणय–सूर्य ज्या स्थानीं, कृष्ण-मेघही जेथें,
राधेचें बहुवर्णी धनु तेथें-तेथें ! ”

–चतुर वचन आयकुनी हास्य करी वनमाली,
प्रेमभरें राधेला कवळी करजालीं !
आलिंगनिं उभयांच्या मदनाच्या सृष्टितलें
इंद्रचाप मेघावर आकारा आलें !

## रूपगर्विता

“ प्रेम कैसें दुज्यावर करावें मीं बाई ?
–मजविना या हृदयीं ठाव कुणा नाहीं !

प्रणयिनी मीच माझी, प्रणयीही मीच,
गुलाबाची मीच कळी, भ्रमरही मीच;

दिव्य मीच सुधाकर, चंद्रिकाही मीच,
रतिपति मीच, तैशी रति तीही मीच !
प्रेमपत्र मी मजला लिहितें—धाडितें,
उत्तरही मीच त्याचें प्रेमातुर देतें !
विरह हो मज माझा—साहावा तो किती ?
आळवितें वीणेवरी मी विरहगीति !
तरीहि न सुचे मुळीं, न रुचे कांहींही,
आहळे हा देह सारा—करूं गत काई ?
सखी वदे, ' अहा ! सर्व छबी उतरली !
बघा तरी आरशांत काय कळा आली ! '
आरसा ती धरी पुढें, न्याहाळतां त्यांत
विरहाचें पर्व सरे तोंच तें क्षणांत !
पाहीं टक लावोनी मी मुखश्री दर्पणीं
पाहतांच चढे बाई ! उन्माद मन्मनीं !
बिंबरूप माषुकातें चुंबीं मी आषक,
चुंबियलें किती तरी न हो आराणूक !
झांकितें मी करीं केंव्हां आपुले लोचन
कांत जसा झांकी निज कांतेचे मागून !
लाजोनी मी म्हणे तेंव्हां ' हें हो काय ऐसें ? '
उत्तर दे मीच, ' म्हणा हें प्रणयपिसें ! '
इकडे मी रूप बघे मुकुरीं आपुलें,
रेखाटतें निज चित्र तिकडे साजिरें !

चित्रीं रंग भरूनिया छाया वठविली,
मूळाहून प्रतिकृति सरस साधिली !
म्हणून तें चित्र वाटे सवतीसमान,
छिन्नभिन्न करूनिया दिधलें फेंकून !

अहा ! किती सांगूं मी हे विलास अनंत !
--माझ्यांतच मी पाहतें स्त्री-पुरुष-द्वैत !
कासया मी प्रेम करूं अन्य कुणावरी
'माझी-मी, मी-माझी !'–ऐसें नातें असे जरी ?"

—यापरिस गर्विता ती पुष्करिणीवरी
बैसोनिया करितसे विचार अंतरीं !
अवचित बिंब पाहे जळांत आपुलें,
जळ किंवा दर्पण ?-हें भान ना राहिलें !
निज बिंबा चुंबूं गेली संभ्रमें भामिनी,
हाय ! पडे जळांतरीं ती झोंक जावोनी !
पसरिते ऊर्मिरूप हात पुष्करिणी
तिजलागीं हृदीं धरी वरीच झेलोनी !

# तोच गीत ऐकितो !

१

“ तरुवरती बैसुनी बुलबुला ! रात्रभरी जागुनी
कंठांतिल साजिरी घुमाविशी गाण्याची बांसरी !
परंतु अवनीवरी राज्य बघ ! संप्रति निद्रा करी :
गीत न कुणि ऐकितें कुणि न तें ऐकुनीहि वानितें !
गाना तव यायचा सांग मग अमरपणा कोठचा ?
उगिच गळा सुकविशी जागुनी उगिच नयन शिणविशी ! ”

२

“ न कां तुम्हां ठाउक असे मी रात्रीचा गायक ?
बुलबुलकंठांतुनी गीततति कधीं निघाली दिनीं ?
निशेचिये अवसरीं लकेरी घेत लकेरीवरी
गानकला सेवितों जीव मम नादरसीं बुडवितों !
न मिळो न मिळे जरी झोंप मज रात्रींतुन पळभरी !
त्यजूं कसें गायन ? ओघ हा कसा अडे अडवुन ?

“निद्राकुल जाहलें जन-विजन पेंगाया लागलें :
गाणें लाखांतुनी ऐकुं ये एखाद्यालागुनी !
तोहि गुरफटे परी स्वतांच्या सुखदु:खाभीतरी –
गीत केंवि हृदिं ठसे ? –ऐकुनी न ऐकिलेंसें जसें !
फार काय ?–मजशिंही नाठवे गातों जें प्रत्यहीं !

यातें भंगुरपणा म्हणतसां तरी सुखानें म्हणा !

“विश्व जयें निर्मिलें जयानें तेज उडुगणा दिलें
सौरभ जो दे फुलां तोच ही वितरी मजला कला !
प्रेरितसे मन्मना म्हणोनी करितों मी गायना–
तोच गीत ऐकितो स्मरणही कल्पवरी ठेवितो !
–पर्णहि जरि हाललें तरी तें जाइ न कधिं विसरलें !–
भंगुरता ही गणूं ? अमरता अथवा यातें म्हणूं ?”

## धुक्याआड

धुकें चहुंकडे आहे भरलें,
न दिसे डोळां हातावरलें ;
सागरतीरीं उभा असुनही
सागरदर्शन मज नच होई ! १

नुकती कोठें पहाट झाली ,
नुकता आला रवि आभाळीं ;
धुकें कसें मग विरेल सत्वर ?
— सागर कुठला दिसेल तोंवर ? — २

न दिसे म्हणुनी ‘ नसेच सागर ! ’—
म्हणतां येइल कसें खरोखर ?

साक्षात् त्याचा पुढें किनारा ,
उभा तयाच्या मी सामोरा ! ३

आसपास मम लाटा फुटती ,
तुषार माझ्या देहीं उडती ;
कल्लोल-ध्वनि उठे सारखा ,
— अस्तित्वाच्या खुणा न या कां ? ४

रवि नभिं चढतां धुकें विलोपुन
सागर अपुलें देइल दर्शन ;
परि त्याआधीं खुणांवरोनी
सहजच येतो तो उमगोनी ! ५

## पुंजीवाद्यांच्या देशांत

पुंजीवाद्यांच्या एका देशाच्या वृत्तपत्रांनीं
लिहिलें: “ यंदां फारच झाली आमची हानी !
जगामधल्या भुकेल्यांसाठीं अपेक्षेवीण
जहाजें आम्ही रवाना केलीं गहूं भरून;
परंतु हाय ! सारीं समुद्रीं गेलीं बुडून !
—हीनदीनांच्या तोंडचा घांस पडे गळून !
तशींच, आम्ही त्यांच्याकारणें होतीं ठेवलीं
कैक कोठारें पिंवळा जर्द गहूं भरलीं.

—दैव फुटलें !— नेमक्या त्याच कोठारांलागीं
न कळे कशा एका समयीं लागल्या आगी !
कशी कुणाला मदत आम्हीं करावी मग ?
—गहूं विकावा लागेल आम्हां —तोही महाग ! "—

साम्यवाद्यांच्या वृत्तपत्रीं ये टीका-टिप्पणी :
" पुंजीवाद्यांच्या देशाचीच ही दुष्ट करणी !
जहाजें त्यांचीं जळीं बुडालीं कधीं कुठून ?
गहूं तेवढा ' सागरार्पण ' केला जाणून !
आपणच तो जाळीत सुटे कोठारांप्रती
—समुद्रापरी अग्नीलागींही देई आहुती !
गव्हाचे भाव वाढवायचे डाव सगळे !
—पुंजीवाद्यांचा देश करील काय निराळें ? "

## अग्निमंदिर

पारशांचें अग्निमंदिर
' आतिश बेहराम ' नांवाचें
पाहिलें मीं आज.
— नाहीं कधीं होणार
विस्मरण त्याचें ! —

मंदिरांत शिरतांच
दिसली स्वच्छता,
दिसली टापटीप.
— वाटली एकाएकीं
प्रसन्नता मनाला !

आंत गेल्यावर
तेथला वृद्ध मोबिद
आला सामोरा —
पांढरी दाढी असलेला,
पांढरे कपडे घातलेला.
नेलें त्यानें मला
गाभाऱ्याजवळ,
दाखविला दुरून
अति पवित्र अग्नि.
होतें त्यांत जळत
चदनाचें खोड,
सुगंधी धूप—
दरवळला त्यांचा सुवास
सर्व मंदिरभर
— वाढली त्यानें आणखी
प्रसन्नता चित्ताची !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम 33638 वि:
क्रमांक 7588 नों: दि: 13-

विचारलें मोबिदाला :
" कधींचा हा अग्नि ?
—कसा सिद्ध केला ?—"
दाढीला गोंजारीत
सांगूं लागला मोबिद :
" आहे हा अग्नि
पुष्कळच जुना.
मात्र ठेवला आहे तो
अखंड धगधगत.
या अग्नीचे असतात
एक हजार विधि !
पहिल्यानें आणतात
सोळा ठिकाणचे अग्नि :
त्या अग्नीवर करतात
परोपरीचे संस्कार;
तेव्हां कुठें सिद्ध होतो
हा परम पावन अग्नि !
सोळा ठिकाणच्या अग्नींत
असतो राजाकडला अग्नि,
असतो पुरोहिताकडला अग्नि;
आणि असतो अग्नि
कुंभाराकडला—लोहाराकडला —

धनगराकडला—शिकलगाराकडला—
फार काय, असतो अग्नि
भट्टीवाल्याकडला देखील ! ”

मोबिदाचें भाषण ऐकून
झालों मी चकित !
वाटला धर्म पारशांचा
खराखुरा लोकधर्म !
केलें मीं अग्नीला वंदन,
लावला कपाळीं अंगारा
मोबिदानें दिलेला
आणि परतलों तेथून
गुंग होऊन विचारांत !

## चार मुक्तकें

### १. धूपपात्र

सृष्टिसती स्वागत करि अरुणोदयिं सवित्याचें :
ठायिं ठायिं ठेवितसे धूपपात्र पुष्पाचें;
गंधमिषें धूर निघे जरि अदृश्य लोचनांस,
नासिकेस परि त्याचा जाणवतो गोड वास !

### २. झोंपाळा

दिवसाचें नभ भासे झुकलेलें– लवलेलें,
कृष्ण निशा असतांना तेंच गमे वर गेलें !
—अवकाशीं झोंपाळा बांधियला जणुं कोणी
खालीं ये, वर जाई आलटुनी–पालटुनी !

### ३. टांचणीघर

निळे मखमली टांचणीचें घर
वाटे हें अंबर;
त्यांत खोवलेल्या असंख्य चांदण्या
वाटती टांचण्या !

### ४. कुंभाराचें चाक

तेजोमेघ–चाकावरी मूलकण–माती
घालूनिया कुशलत्वें अदृश्य कुंभार
तिच्यांतून करितसे विश्वाची निर्मिति !

## झाडांचं गाणें

आहे आम्हां झाडांची
जातच मुळीं निराळी:
कशाला लावतां आम्हांला
कसोटी तुम्ही आपली ?

नाहीं नेमलें आम्हांला
रस्त्यावरून फिरायला;
नाहीं नेमलें आम्हांला
आकाशांतून उडायला ! २

आहे नेमलें आम्हांला
एका जागीं रहायला;
आहे नेमलें आम्हांला
जमिनींत खोल शिरायला ! ३

ज्याच्यासाठीं नेमणूक
नाहीं झाली आमची—
त्याच्यासाठीं कींव-करुणा
कशाला हवी तुमची ? ४

आमचे अवजड आकार
फिरूं द्या रस्त्यावरून
भीतीनें पळत सुटाल
तुम्ही जीव घेऊन ! ५

आणि आमचे आकार
उडूं द्या आकाशांतून
सोडाल तुम्ही प्राण
तें दृश्य विलोकून ! ६

असूं द्या आम्ही असलों
सजीवांतले एकले
एकाच जागीं स्थिर
जखडून ठेवलेले! ७

परंतु म्हणूनच आम्ही
शिरतों जमिनींत खोल खोल–
म्हणूनच आम्ही राखतों
आमचा समतोल! ८

आमचा तोल साधल्यानें
देतों सावली प्राण्यांना;
आमचा तोल साधल्यानें
देतों आसरा पक्ष्यांना! ९

–आहे आम्हां झाडांची
जातच अशी निराळी :
कशाला लावतां आम्हांला
कसोटी तुम्ही आपली? १०

# भिंती

उंच उंच भिंती–
गगनचुंबी भिंती !
आम्ही मनानें कल्पिल्या,
मनानेंच आमच्यांत उभारल्या;
जीवापाड जतन केल्या,
आजपावेतों टिकविल्या !
–आहे तयारी आमची
नव्या नव्या भिंती बांधायची ! १

उंच उंच भिंती–
गगनचुंबी भिंती !
पाडले त्यांनीं आमच्यांत तट,
केले आमचे अभेद्य गट–
वंशांवरून, धर्मांवरून,
जातींवरून, देशांवरून !
फक्त व्यक्तीव्यक्तीवरून
उरले व्हायचे गट अजून ! २

उंच उंच भिंती–
गगनचुंबी भिंती !

शिकवितात द्वेष करायला,
माणसानें माणूस मारायला !
त्याचेंच आहे जहरी फल
अणुगोल, उज्जगोल !
एकमेक एकमेकांस मारून
जाऊं कां सारेच मरून ? ३

उंच उंच भिंती—
गगनचुंबी भिंती !
आपणच मनानें बांधणारे,
होऊं मनानें पाडणारे !
भिंती नुरतां आमचें क्षितीज
विशालता पावेल सहज !
खुल्या आभाळाखालतीं
नांदूं मग गोडीनें जगतीं ! ४

## बलिदान

मदुरेचा नेदुमारन् भूप प्रासादास
जैन धुरीणांस
पाचारून वदे, "जैन मी आतां नुरलों,
शैवधर्मी झालों.

—राजासम व्हावी प्रजा !—तुम्ही जैन सारे
झणीं शैव व्हा रे !
शैव साधु संबंदर मीनाक्षी-मंदिरीं
दीक्षाविधि करी.
इतःपर कुणी जैन नुरो मदुरेंत
—पांड्य नगरींत— !" १

नृपालाच्या आदेशानें जैनधर्मीयांत
खळबळ होत !
पार्श्वनाथ—मंदिरांत आम सभा त्यांची
भरे निकडीची.
धर्मान्तर करावया विरोध सर्वांचा
होई निकराचा !
"मरूं परि जैन राहूं !"—उठे घोषनाद,
घुमे पडसाद !
नेदुमारन् भूपास हा कळे समाचार,
खवळला फार ! २

सत्वरच सुरूं झालें नृपाच्या सैन्याचें
सत्र संहाराचें !—
सैनिकांनीं घरेंदारें जैनांचीं लुटून
टाकलीं पाडून !
तीर्थंकर—मूर्ति त्यांच्या फोडल्या-तोडल्या,

धुळींत फेंकल्या !
ताडपत्री पोथ्या त्यांच्या अग्नीस अर्पिल्या
—ज्वाला नभीं गेल्या !—
सान-थोर सारे जैन नेले पकडून
मुसक्या बांधून ! ३

बुडविले कैक जैन वेगाई नदींत,
कमल सरांत !
उकळत्या तेलामाजी कैकांस टाकलें,
घाण्यांत घातलें !
भिंतींमधें, बुरुजांत कैकांना चिणलें,
भुईंत पुरलें !
धर्मासाठीं शूरांपरि जैन देती प्राण,
न जाती शरण !
—अजून हें बलिदान मदुरा पुरींत
लोक सांगतात ! ४

## पोटासाठीं

पहाट फुटली
रात्रीच्या झडीला
चिंब हो भिजून

तरीही अजून
खंड पडला न !
सृष्टीचा पसारा

वाहे भणभण झोंबणारा वारा !

दारीं भिकारीण आली अशा वेळीं
होतें बांधलेलें मूल पाठकुळीं.
चिंध्या-चिरगुटें —तींही ओलींचिंब !—
तान्हुल्यास मग कैंची मिळे ऊब ?
सारखी चालली त्याची किरकीर,
मधूनच टाहो फोडी अनिवार !
दृश्य हें पाहून चित्त हेलावलें,
द्यायचें तें तिच्या झोळींत टाकलें !

म्हटलें, " कशाला श्रावणझडींत
मूल तूं आपलें आणलें सोबत ? "
गहिंवरून ती वदे, " काय करूं ?
पोटासाठीं सवें घेतलें लेंकरूं !
एकली मागतां भीक दारोदार
देईना कुणीही भाकरीचें कोर !
म्हणून अघोरी उपाय योजिला :
पाण्यापावसांत आणलें बाळाला !
त्याची तरी दया येईल कुणाला,
शिळें-पाकें अन्न मिळेल मजला—
या आशेनें देतें लेंकरास शीण
माझ्याच बाळाची मी झालें वैरीण ! "

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 92650
शाखा

—मधेंच थांबली दीन भिकारीण २५
रडाया लागली फुंदून फुंदून !
माझेही नयन आंसवें भरले :
केव्हां पुढें गेली कळून न आलें !

## उगम

दूरवरून
प्रेरणा मिळे जगावयाची मजलागून ! १
त्या प्रेरणेचा
जीवनदायी उगम आहे फार दूरचा ! २
आहे अंतर—
आहेत गिरि, आहेत नद्या मधें दुस्तर ! ३
परि कांहींही
प्रेरणा मला मिळावयाच्या आड न येई ! ४
मनांत भाव :
हाताजवळी उगम आहे—दूर न लव ! ५
' हातासरसें— '
असेंही तरी कशाला म्हणूं ?— हृदींच वसे !— ६
अशी दुरून—म्हणा आंतून—
प्रेरणा मिळे जगावयाची मजलागून ! ७

# सहलींत

सहलींत लागे एक गांव चिमुकलें
पहाडाच्या पायथ्याशीं होतें वसलेलें.
विसावलों झाडाखालीं गोठाणावरतीं,
गांवकरी तिघे--चौघे जमले भंवतीं.

म्हटलें मीं, “ खेडेंच हें, परंतु सुंदर !
—पश्चिमेच्या पहाडानें हो सुंदरतर ! ”
उसळून एक वदे, “ पहाड कसला ?
——भली मोठी धोंड आली आडवी गांवाला !
नच दिसे—नच कळे—त्यापलीकडलें,
पश्चिमेचें क्षितीजही आकुंचित झालें ! ”

त्यांच्यांतला दुजा बोले, “ पहाडालागून
कशासाठीं दोष देतां ?—ध्या थोडें जाणून !—
धोंड तुम्हां वाटतसे त्या पहाडावर
चढून जा आणि बघा तेथून चौफेर :
चौकडलें विस्तारलें क्षितीज दिसेल,
विशालता ‘बाहेर’ ची ‘आंत’ ही येईल ! ”

शब्द भिन्न, परि भाव हाच शब्दांतला,
सुखावून त्यानें मार्ग मी धरी पुढला.

# अस्मिता

त्या रात्रीं झोंपमोड—ना कळे—कशी
झाली. तों नजरेला येति आकृती
तेजोमय, पारदर्शि. त्यांमधें कुणी
सौम्य, कुणी रौद्र, तेंवि कुणि हिडीसही !
मनिं भ्यालों, परि वदलों, " कोण रे तुम्ही ?
बंद दार असुन केंवि आंत पातलां ? "

त्यांच्यांतिल एक म्हणे, " ऐक, भिउं नको.
आलों तव देहांतुन, जायचें असें
त्यांत पुन्हां. सुष्ट–दुष्ट वृत्ति ज्या तुझ्या,
आकारा त्या आल्या आमुच्यामिषें.
प्रत्यय तुज आणाया प्रकट जाहलों
कीं, ' न एक, परि अनेक मिळुन होशि तूं ! '
–अमुच्यांतिल बहुविधता हेंच दर्शवी !—
अस्मितेस पदर विपुल यापरी तुझ्या,
म्हणुनी तूं भिन्न भिन्न भासशी जनां !
तूंच काय ?–आहे हा नियम मानवी !
—उमगुन हें जगिं वावर !—"

आणि, तत्क्षणीं
आकृति त्या माझ्यामधिं लोप पावल्या !

भास म्हणा, स्वप्न म्हणा, सत्य वा म्हणा;
अनुभवलें तेंच इथें परि निवेदिलें. २०

## मनांतलें सौंदर्य

इंद्रचाप रम्य असो असे जरी;
माझ्या अंतरींच्या रंगांत रंगतें,
याकारणें रम्य तें मज भासतें ! १
भैरवी मधुर असो असे जरी;
माझे अंतर्नाद मिसळती तींत,
त्यायोगें मधुर ती होई प्रतीत ! २
केवडा सुगंधी असो असे जरी;
माझ्या अंतरींच्या सुवासें नटतो,
म्हणून तद्गंध धुंद बनवितो ! ३
सौंदर्य विश्वांत असो असे जरी;
परि अंतरीं जें सौंदर्य वसतें,
तेणेंच तें विश्वीं प्रत्ययास येतें ! ४

## दुसरी शस्त्रक्रिया

त्याला आठवली एक शस्त्रक्रिया :
केलेली त्यावर उजव्या बाजूचें

पोट दोन इंच
चिरून आंतलें
वीतभर लांब
'आंत्रपुच्छ' त्याचें
होतें काढलेलें !

....तोंड आणि नाक
वस्त्रें झांकलेले,
शुभ्र झग्यांतले
डॉक्टर....सेविका ....
....औषधांचा दर्प....
....लखलखणारीं
शस्त्रें-अवजारें....
....पाठीच्या कण्यांत
बधिर होण्याचें
द्रव टोंचलेलें....
—सारें सारें आज
स्मरणीं ये त्याच्या !

आणि 'आंत्रपुच्छ
आहे अवशेष
पशूच्या पुच्छाचें !'—
हेंही कुठें तरी
त्यानें वाचलेलें
त्याला आठवलें !

वदला स्वतांशीं :
"आंत्रपुच्छरूपें
होती माझ्यामध्यें
पशुत्वाची खूण !
शस्त्रक्रियेमुळें
ती नाहींशी झाली !
परंतु समूळ
नष्ट कुठें झाला
माझ्यांतला 'पशु' ?
गेली देहांतली
पशुत्वाची खूण ;
परि मनांतली
कायमच उरे !
तिजवरतींही
दुजी शस्त्रक्रिया
न कां कधीं होई ?"

## पांढरा मोर

पूर्णशशांकाचा धवल मयूर
कुणी तरी नभीं मोकलिला स्वैर !
नाचतच अपरेला चालला निर्भर ! १

उभारिला त्यानें किरण-पिसारा !
अवकाशभर त्याचाच पसारा !
स्पर्शें त्याच्या पानोपानीं विकंपित धरा ! २

पिसाऱ्याचा तोच स्पर्श सुखकर
शिणल्या-भागल्या माझ्या देहावर
गुदगुल्या गोड गोड करी अनिवार ! ३

धवल मयूर, धवल पिसारा,
धवल अंबर, धवल ही धरा;
—धवल हो हृदींचाही कोंपरा-कोंपरा ! ४

## गस्त

रात्र होतांच
खेडें अवघें
जातें बुडून
अंधारामधें.
नाहीं दिसत

एकही दिवा
रस्त्यांवरती.

खेड्यामधल्या
झोंपड्या, घरें,

देवळें, झाडें
यांच्या सांवल्या
झोंपी जातात
एकमेकींच्या
अंगांवरती
स्वैर पडून !
कळत नाहीं
सांवली आहे
कुठें कुणाची !

गस्तवाल्याची
गस्त चालते
सबंध रात्र.
एका करांत
हातकंदील,
दुसऱ्यामधें
जाडशी काठी
—अशा थाटांत
तो गस्तवाला
घालतो गस्त
रस्त्यांवरून.
' हुश्शार ! ' अशी
देतो आरोळी.
चालतांना तो
जमिनीवर
आपटी काठी.
तेव्हां त्याच्या त्या
काठीवरती
जडवलेल्या
घुंगरांचा हो
मंजुळ ध्वनि !

गस्तवाल्याचा
हातकंदील
चालण्यामुळें
हेलकावतो
एकसारखा.
ज्या सांवल्यांच्या
समोरून तो
कंदील जाई,
त्यांची चाळवे
क्षणैक झोंप
प्रकाशामुळें !
परि त्या पुऱ्या

जाग्या होऊन
उठण्याआधीं
गस्तवाल्याची
स्वारी पुढतीं
निघून जाते !
—आणि दिव्याचा
उजेड तोही
पुढें सरके !—
त्याबरोबर
अर्ध्यामुर्ध्याच
जाग्या झालेल्या
सांवल्या पुन्हां
गाढ निद्रेच्या
आधीन होती
—एकमेकींच्या
अंगांवरती
स्वैर पडून !—
—हा खेळ चाले
फिरफिरून
गस्त सरे तों !
फक्त दोनच
सांवल्या देती
साथ आपली
गस्तवाल्याला !
—त्याही त्याच्याच
दोन पायांच्या !

# निसर्ग आणि मानव

**मानव :**

तव उदरिं निसर्गा ! गूढें किति दडलेलीं !
अति अल्प त्यांतलीं माझ्या हातीं आलीं !
उकलून दाविशी कधिं उरलेलीं सगळीं ?
–ही एकच चिंता मनिं घर करुनी बसली ! १

ज्याच्या अंतरीं सौंदर्य वसे,
अवसेंतही तें त्यास दिसे ! ७

## शिकलगार

धार लावून घ्या धार ! ध्रु०

आलों आहें मी लांबून फार,
धंद्यांत पुरता वाकबगार;
माझा सारा रोख व्यवहार,
नसतें माझें काम उधार !
धार लावून घ्या धार ! १

चाक आहे टणक कुरुंदाचें,
पट्ट्याचें चामडें चिवट मोटेचें;
पट्टा ओढायला पोर दणकट,
धार लावायला माझें मनगट !
धार लावून घ्या धार ! २

धार लावा चाकू-कैच्यांना,
धार लावा विळ्या-कोयत्यांना;
धार लावा सुऱ्या-कट्यारींना,
असतील जवळ तर तलवारींना !
धार लावून घ्या धार ! ३

लखलख त्यांचीं पातीं होतील,
त्यांत तुमचीं तोंडें दिसतील,
नको आयना कुंकू रेखायला,
तसाच नको गंध टेकायला !
धार लावून घ्या धार ! ४

अवजारें तुमचीं झालीं बोथट,
म्हणून तुमचीं मनें पोंचट !
अवजारें लावून घ्या अगोदर,
मनाला चढेल धार नंतर !
धार लावून घ्या धार ! ५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम 33838 वि: 05
क्रमांक 7566 नों. दि: 1

## मातरिश्वा

### ऋभूंचें ध्रुवकः

मातरिश्वन् ! तूं मानव-मित्र,
गाऊं आम्ही नित्य तुझें स्तोत्र ;
करूं तुझा मुखीं वारंवार
उच्च रवें जयजयकार !

### पहिला ऋभुः

आम्ही ऋभु मूळचे मानव,

तपामुळें जरी झालों देव.
अन्य देवां अजून आमचा
येई 'वास' मनुष्यपणाचा !
त्यांच्याहून आम्हां जवळचे
मानवच भूलोकावरचे !
वन्य दशा तयांची पाहून
तिळ तिळ तुटूं लागे मन;
मातरिश्वन् ! तुजला भेटून
दशा त्यांची केली निवेदन.
ज्याचें एक रूप तूं असशी,
संस्कृतीचा उगम ज्याच्याशीं—
तोच अग्नि धरातलावर
न्यावयाचा तूं केला निर्धार !

## दुसरा ऋभुः

कारागीर आम्ही जातिवंत
खपूनिया न घेतां उसंत
दिव्य रथ, पात्र घडविलें
अग्निभय मुळीं नसलेलें.
मातरिश्वन् ! रथीं आरूढशी,
पात्रही तें स्वतांसवें नेशी;
मनोवेगें सूर्यलोका जाशी,

पात्रामधें सविताग्नि घेशी;
परस्पर भूलोका जाऊन
तेथें अग्नि दिलास ठेवून.
भूलोकांत अग्नि ये प्रथम,
मानवांचा मार्ग हो सुगमः
इहपर उभय साधून
करतील सार्थच जीवन.

## तिसरा ऋभुः

मातरिश्वन्! परि तुझ्यावर
देवेंद्राचा कोप हो दुर्धर!
भूलोकांत अग्नि न्यावयाला
अनुज्ञा न त्याची होती तुला.
शापी तुज : ‘ मानवांपरिस,
छाया तुझी पडेल हिडीस!’
देवांची न पडते सांवली,
शापें तुझी पडाया लागली!
कलंक तो देवांना वाटला,
जो तो तुला टाळाया लागला!
देव सुखें तुज उबगोत,
छायेमुळें इष्ट तेंच होतः
मनुष्यत्व देवत्वीं मिळोनी
तुझ्या ठायीं दोहोंचा जुळणी!

ऋभूंचें ध्रुवकः

मातरिश्वन् ! तूं मानव–मित्र,
गाऊं आम्हीं नित्य तुझें स्तोत्र ;
करूं तुझा मुखीं वारंवार
उच्च रवें जयजयकार !

## प्रेमभक्ति

त्यानें केली तिच्यावर प्रीति फार
अपेशाच ये अखेर !
तिजसाठीं लागला तो झुरणीस
घे एकच तिचा ध्यास !
किती काळ गेला तरी न विसरे,
अहर्निश तिला स्मरे ! १

काळासवें प्रीती त्याची गाढ होई,
तशीच हो विशुद्धही.
वासनेचा—स्वामित्वाचा—नुरे लेश
—हीण जातां हेम शेष !
प्रेयसीच्या भोंती करी तो निर्माण
दिव्यत्वाचें आवरण.

अपरूप अंगना ती अप्राप्तीनें
सहजच देवी बने ! २

बालपणीं झाले त्याच्या मनावर
आस्तिक्याचे जे संस्कार,
ते अवघे एकाएकीं झाले जागे,
ईशाची त्या ओढ लागे !
स्त्री कल्पून ईशाचें तो करी ध्यान
चमत्कार ये घडून :
तें स्त्रीरूप मनीं त्यानें कल्पिलेलें
प्रेयसीशी मिळे—जुळे ! ३

## इतकेंच

नभोवाणीवरी
एकाएकीं आज तुझी ऐकिली वैखरी ! १
किती काळ गेला
शब्दही न तुझा माझ्या कानावर आला ! २
जाण्यासाठीं येशी !
–बोल पुन्हां ऐकण्याची आस धरूं कशी ? ३
परि नभोवाणी
आज तुझी गिरा कानीं वाहूनिया आणी ! ४

पुढेंही यापरी
कधींमधीं तुझी ऐकूं येईल वैखरी ! ५
—बाकी सरे सारें !—
इतकेंच तुझें आतां माझ्यासाठीं उरे ! ६

## सागर

माझिया अंतरीं आहे सागर,
आहे अंगचाच अशांत फार ! १
भरती—ओहटी तयास येती
अशांत आणखी त्यातें करिती ! २
भरती-ओहटी त्या सागराला
आणणाऱ्या चंद्रा ! विनंती तुला : ३
"तूं तरी आवरी आपली माया—
भरती-ओहटी न आणी तया ! ४
नाहीं तो अशांत कमी मुळांत
कशासाठीं भर घालशी त्यांत ? ५
अंगचा अशांत असे जितका,
राहणार आहे नित्य तितका ! ६
नको ती अशांति वर्धित व्हाया
—इतकी त्यावरी करी रे दया !" ७

## जीर्ण गढी

जुनी गढी टिकणार किती ?
–कोसळल्या अर्ध्यामुर्ध्या भिंती !
समोरच्या बुरुजामधून
पिंपळाचें झाड फोंफावून
बुरूज तो गेला दुभंगून ,
सत्वरच करील शयन !
जागोजाग बिळें तरी किती !
–घोरपडी –नागांची वसती ! १

कुठवर भिंतींतें लिंपाल ?
कुठवर बिळें बुजवाल ?
उभाराया पडलेल्या भिंती
मिळवाल कुठें शुभ्र माती ?
डागडुजी गढीची करून
पूर्वस्थिति तिला ये कुठून ?
जुन्याचें न कधीं होई नवें ,
विलयास जुनें जाया हवें ! २

जीर्ण गढी पुरती पाडून
वास्तु तेथें उभारा नवीन.
कार्यभाग गढीचा सरला ,

कां झटतां टिकवाया तिला ?
टिकवून टिकणार नाहीं
—कसें तुम्हां कळतें न हेंही ?
जुन्याची घे जागा नवें जेव्हां ,
सार्थकता जुन्याची हो तेव्हां ! ३

## तोरणाखालून

सप्तरंगी इंद्रधनु नभीं पाहून
बालक हो क्षण जागें माझ्यामधलें;
सहजच मग माझ्या मनांत येई :
माझ्यासाठीं हें तोरण रम्य बांधलें :
त्याखालून जाऊन तें टाकावें मागें-
बालकत्वें ओढ अशी मनास लागे ! १

पळावया लागलों मी द्रुतगतीनें
न पाहिले उंचवटे, खांचखळगे !
पुढें पुढें परि पळे इंद्रधनुष्य,
धनूच्याही पुढें पळे क्षितीज वेगें !
शर्यतच जणूं चाले आम्हां तिघांची,
शिणण्याची-दमण्याची आशा न त्यांची ! २

सत्वरच दमछाक माझी होऊन
थांबलों मी, मजसवें तींही थांबलीं !
—कल्पनेंत घडत हें सारें असतां
प्रत्यक्षांत तोंच धनु लोपे आभाळीं !
पुनरपि माझ्यांतलें बालक निजे ,
पुनरपि वागवीं मी वयाचें ओझें ! ३

## निःशब्दपणें

नवी पालवी तरुला फुटतां
संवेदन त्या कसें होतसे ?
कुणास ठाउक !—मात्र वाटतें
सुखसंवेदन खचित तें असे ! १

पिकलीं पानें तरुचीं गळतां
संवेदन त्या कसें होतसे ?
कुणास ठाउक ! —मात्र वाटतें
सुखसंवेदन खचित तें नसे ! २

सुखामधें तरु शब्द न करतो,
तसाच न करी तो दुःखींही;
प्राप्त जाहल्या सुख-दुःखांतें
निःशब्दपणें भोगित राही ! ३

## रंगांचें गाणें

किती खुळे तुम्ही सारे आहांत !
कसें तुम्हां कांहीं नच कळत ? १
'प्रकाश, प्रकाश ! '— म्हणतां फोल !
रहस्य न ठावें तुम्हां आंतील ! २
सात रंग आम्ही एकत्र येतों,
अवघे मिळून नाचूं लागतों ! ३
नर्तनाची लय शिगेस जातां
आम्हांत न दिसे तुम्हां भिन्नता— ४
भासेः मिसळलों एकमेकांत,
धवलता तुम्हां नेत्रीं दिसत ! ५
'प्रकाश' मग त्या तुम्ही म्हणतां !
—मुरकुंडी वळे हांस-हांसतां ! ६
किती खुळे तरी सारे आहांत !
कसें तुम्हां कांहीं नच कळत ? ७

## त्यावेळीं असेन !

मानव जन्मास यावयाच्या आधीं वसुधेवरतीं
पहिल्या झाडाची ज्यावेळीं जाहली अद्‌भुत उत्पत्ति— १
त्यावेळीं त्या ठायीं असेल मदात्मा मूळच्या दशेंत,

तो झाला असेल झाड तें पाहून फारच चकित ! २
वाटलें असेल माझ्या आत्म्यालागीं त्या झाडाचें प्रेम :
संक्रमित झालें असेल तें त्यांत पुढें जन्मोजन्म ! ३
तेंच प्रेम आलें असेल माझ्यांत याही जन्मांतरीं,
म्हणून असेल मला आवडत तरुसृष्टि सारी ! ४
वाटे मज व्हावें पुढल्या जन्मांत झाडच आपण
—पहिल्या झाडाचें प्रेम या सर्वांचें दिसतें कारण ! ५

## नवी भर

“ तूं कोणती नवी भर
जगतांत घालणार ? ”

“ मेल्यावर पोतेंभर
राख माझी पडणार !
धरेंत ती मिळणार,
तिचें मान वाढणार !
—यापरिस नवी भर
जगांत मी घालणार ! ”

# नीरवता

या घोर रानीं
भर दुपारीं
सूर्याचें ऊन
सलगपणें
शिरूं शकेना !
तरुपर्णांच्या
चाळणींतून
खालीं पडले
हे कवडसे.
हालतात ते ,
हालतीं जेव्हां
झाडें वाऱ्यानें.

रानामधल्या
नीरवतेला
तुलना नसे !
—कुणास ठावें
योगी—हृदयीं
तशी असेल ! —
ऐन दुपारीं
जी नीरवता
रानीं आढळे,
ती नगरांत
मध्यरात्रींही
प्रत्यया न ये !

हे नीरवतें !
रान सोडून
अंशरूपानें
जरी मन्मनीं
तूं वसशील,
तरी तेथल्या
अशांततेचा
लोप होईल
आणि लाभेल
शांतता जीवा !
—केव्हां हा येई
योग जीवनीं ?

## साफल्य

स्वर्गंगा मीं नभीं पाहिली :
दिव्यत्वाची, भव्यत्वाची
अनुभूती मज उत्कट आली ! १

आणि पाहिलें तुला भूतलीं :
सौंदर्याची, माधुर्याची
साक्ष मनाला पुरती पटली ! २

अलौकिक असे प्रत्यय आले :
नको विफलता मज वाटाया—
साफल्यच जगीं जन्मुन झालें ! ३

## पिकासोचें कबूतर

१

चित्रकार पिकासोनें रेखाटलें
उडणारें कबूतर चित्रीं :
निळ्या निळ्या आभाळांत
पसरून दोन्ही शुभ्र पंख
आणि पाय दुमडून मागें
कबूतर उडतांना चित्रामधें दिसे.

वेगवान प्रवाहांत वाहतसे काष्ठ
कीं विमान उडतसे दुभंगत हवा–
त्यापरिस हें उडतें कबूतर भासे !

कबुतरा मानितात शांति-दूत :
शांततेच्या संदेशातें
पोंचवाया देशोदेशीं
चाललें हें पिकासोचें
उडणारें कबूतर काय ?

२

पिकासोच्या कबुतरा !
आहेस तूं चित्रगत :
नाहीं तुला देह-प्राण,
नाहीं तुला संवेदना ;
पण त्याची कशाला रे खंत ?
उलट हें–समज तूं–
झालें आहे हिताचेंच तुझ्या !
सजीव तूं असतास जर,
उडतास उंच उंच नभीं;
आणि कुणी शांततेचा भोक्ता
पाठविता देशांतरा तुला

शांति-दूत या नात्यानें.
--परि त्यांत कबुतरा!
खराच रे होता पुरा धोका!

३

पहा, पहा, या आमच्या
शांति-प्रिय भारतांत
परदेशी पक्षी येती हिमकाळीं
चुकवाया तिकडील तीव्र शीत.
परि कैक त्यांमधले पक्षी
भारतांत येतांक्षणीं कालवश होती!
केंव्हां तरी—कुठें तरी—
झाली त्यांना घोर बाधा
'किरणांच्या उत्सर्गा'ची!
करतात अणुस्फोट वारंवार
सत्तास्पर्धी युद्धखोर राष्ट्रं:
कळतें न—वळतें न—त्यांना
विनाशाच्या दरींत तीं
लोटतात जीवसृष्टि सारी!
—मानवही न सुटती त्यामधून!—

अरेरे!—हे परदेशी पक्षी!—
—किती त्यांचे चिमुकले देह!—

—रंग तरी तऱ्हेदार किती ! —
--किती त्यांचीं मऊ मऊ पिसें ! —
—आणि शब्द मृदु-मधु किती ! —
—परंतु हो हें अवघे फोल ! !
ज्या आमच्या भारतांत
ते निवारा शोधावया आले,
तीच भूमि हो थडगें त्यांचें !
—केवढा हा दुर्विलास
नशिबाचा म्हणूं ?

पिकासोच्या कबुतरा !
असतास सजीव तूं जर ,
हीच होती तुझी गत
भारतांत वा देशांत अन्य !
तूंच काय ?—श्रीविष्णूचा गरुडही
अंतराळीं उंच उंच झेपावता
पसरून स्वर्णासम दिव्य पंख —
आणि जाता या देशींचा त्या देशांत,
तरी त्याला खचितच होती बाधा
'किरणांच्या उत्सर्गा' ची
वाटेमधें कुठें तरी !
—अंतीं तोही गवसता मृत्युमुखीं !
पिकासोच्या कबुतरा !

म्हणूनच मी म्हणतों –
निर्जीव तूं असलास जरी,
नको त्याची मुळींच रे खंत !
ज्या जगांत संहारार्थ
अणुशक्ति वापरती,
त्या जगांत सजीवाचा
जन्म तरी कशासाठीं हवा ?
आणि जेव्हां कधीं काळीं
युद्धामधें गोंवलेलीं राष्ट्रें
उज्जगोल सोडतील
संहाराया परस्परां,
तेव्हां सर्व सजीवांच्या सवें
होतील रे निमिषांत नष्ट !
–पिकासोच्या कबुतरा !
तूंही मग चित्रासह निज
पडशील अग्निमुखीं !

आणि जरी दैवयोगें
तुझें चित्र शेष राही
त्या भीषण प्रलयींही,
तरी त्याचें करावया चोज
मानव न भूवरतीं उरे !

काय मग करायचें
चित्र तुझें तें असून – वा नसून — ? ९०

## शंका

वेणूच्या स्वरांनीं निनादलें वेणुवन
स्वर ते टिपाया जीवाचा मीं केला कान ! १
याच स्वरांसाठीं भटकलों जन्मभर,
याच स्वरांसाठीं जीविताचा हो जुगार ! २
स्वर कानांवाटे हृदयांत शिरतात—
तेथें जसे काय निनादत राहतात ! ३
याकारणें शंका मनामधें माझ्या येई :
वेणु कुठें वाजे ?– वेणुवनीं कीं हृदयीं ? ४

## धीरू धोबी

धीरू धोब्याचा बैल निमाला,
पायींच जाई धोबीघाटाला. १
पाठीस ओझें, घमेलें वरी,
यापरी रोज खेपा तो करी ! २

एका रात्रीस वळीव आला ,

गांवनदीला पूर लोटला! ३
तिच्या कांठचा धोबीघाटही
पाण्यांत पार बुडून जाई! ४
नव्हता रात्रीं धीरू त्या ठायीं,
नव्हता धोबी अन्य कुणीही! ५
दुसऱ्या दिनीं गिऱ्हाइकांला
धीरू भेटला दोघां–चौघांला; ६
सांगे, "कालच्या रात्रीं पुरांत
मैलभर मी गेलों वाहत! ७
अडलों एका झाडालागून
म्हणून तरी आलों वांचून! ८
कपडे मात्र वाहून गेले,
फारच थोडे हातीं लागले! ९
अपराध हा खराच झाला,
पोटाला नको मारा पाठीला!" १०
–गिऱ्हाईक ते सुन्न जाहले,
काय बोलावें त्यां नच कळे! ११

धीरू धोब्याच्या घरासमोर
दिसूं लागला बैल सत्वर! १२
धोबीघाटाला पहिल्यापरी
बैलावरून खेपा तो करी! १३

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १२८५०

## तुझ्यांतलें शाश्वत

कालमुक्त अवकाश असे कुठला ?
त्यांत गेह मिळे कसें रहाया तुला ?
कालातीत सदनांत राहिल्यावीण
जरामुक्त कसें होई तुझें यौवन ? १

परि माझ्या हृदयीं मीं आहे धरिली
मनोरम मूर्ति तुझी यौवनांतली;
येवो जरा !—जीवंत मी जगीं जोंवर,
अजरच तूं हृदयीं माझ्या तोंवर ! २

कशासाठीं प्रीतीलागीं हवें यौवन ?
—प्रिय मज तें केवळ तुझें म्हणून !
प्रीति माझी तुझ्यांतल्या शाश्वतावर,
तयापुढें तुच्छ गमे सारें इतर ! ३

## ईदेचा चंद्र

म्हातारा कादर गवताचा भारा
विकून निघाला घरास माघारा. १
हातामधें त्याच्या होता त्याचा विळा
गवत कापाया रानांत नेलेला. २

जातां जातां पथीं येई त्याच्या कानीं
'ईद मुबारक !— ' आनंदाचा ध्वनि ! ३
म्हणे, "मंद नेत्रां कैंची दिसणार
ईदेच्या चंद्राची इवलीशी कोर ? ४
परि ती असेल गगनीं उदेली—
उठे आनंदाची तरीच आरोळी ! ५
कोर असणार माझ्या विळ्यापरी
बांक आणि टोंक दोन्ही असणारी ! ६
नभींचा हा विळा पाक मुस्लिमांचा
संपवी आतांचा महिना रोजांचा ! ७
आणि हातांतील माझ्या विळ्यामुळें
रोज घडायचा रोजा माझा टळे ! ८
—अशा या विळ्याच्या रूपानें मजला
ईदेचा चंद्रच सदाचा लाभला ! ९
अन्यांचा ईदेचा चंद्र आकाशांत,
माझ्या तो घरांत ! —छे, छे, या मुठींत ! १०

## तित्तिरवाला

आज दिसे वृद्ध एक गांवाबाहेर
टोपल्यांत चार-सहा त्याच्या तित्तिर.
वाळवीचें वारूळ तो काठी घालून

उकरतो हळूंहळूं यत्नेंकरून.
म्हटलें मीं, " वारुळांत भुजंग वसे,
डिवचशी अकारण तयास कसें ?"

वदला तो, " माझे मला प्रिय तित्तिर,
जावोत हे प्राण सुखें त्यांच्याखातर !
घरामधें दाणाही न कालपासून,
— आहों आम्ही सारेजण अन्नावांचून !
तित्तिरांस कसें ठेवूं भुकेले परी ?
तयांलागीं आवडते वाळवी भारी !
म्हणून मी आणीं त्यांतें वारुळापाशीं
— वाळवीची मेजवानी देतों तयांशीं !
भय नसे मज कसें भुजंगमाचें ?
— मात करी परि प्रेम विहंगमांचे ! "

पुन्हां लागे तो वारूळ उकरायला,
वृद्ध तरी पक्षीवेडा तित्तिरवाला !

## माझें सूफी मन

आरंभ दिनाचा सुखांत सदा व्हाया,
मानवा दुवा द्याया, १

अदृश्य अंगना उभारी स्वकरास
पूर्वेला पहाटेस. २
तिच्या त्या कराचा तळवा मात्र दिसे
—वर्णावें तया कसें?— ३
गोरटा, गुलाबी, तशांत मेंदीमुळें
लावण्य उचंबळे ! ४

माझें सूफी मन पाहून तळ्यातें
विरहें आक्रंदतें ! ५
दिव्य अंगनेचें मीलन व्हावयास
तें होई कासावीस ! ६
कोठूनिया मग आरंभ दिवसाचा
सुखांत व्हावयाचा ? ७
महाविरहांत दिवस उगवतो ,
त्यांतच मावळतो ! ८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम 33८3४ वि:
क्रमांक १५८८ नोंद दि:

## दडवलेली उंची

जानश्रुति : ब्रह्मवेत्त्यांचा
मुकुटमणी
दूता, तुज मीं अशा रैक्वाचा ५
होतें धाडलें घ्यावया शोध.

सांग तूं काय
वार्ता आणली?

दूत :

राजन् ,आपली
सारी नगरी
शोध-शोधली;
ऋषिमुनींचे
आश्रम तेही
कैक धुंडिले !
परि कुठेंही
रैक्वाचा शोध
नाहीं लागला !

अखेर एका
गांवांत पथीं
उन्हापासून
रक्षण व्हाया
शकटाखालीं
एक मनुष्य
दिसला मला.
होता सर्वांग
तो खाजवीत
दोन्ही हातांनीं !
सहज त्याला
रैक्वाविषयीं
मीं विचारलें,
तोंच तो स्वतां
रैक्व म्हणून
उमगून ये !

जानश्रुति :

अहाहा ! आज
धन्य मी झालों !
महामुनीचा
लागला शोध !
जाईन उद्यां
त्याच्या गांवाला,
घेईन त्याचें
पुण्य दर्शन
आणि करीन
तया प्रार्थना
ब्रह्मस्वरूप
समजावून

मला देण्याची !

**दूत :**

प्रभो, बोलतों
तयाची क्षमा
दासास व्हावी.
परि चुकेन
निज कर्तव्यीं
जरी अवघें
न निवेदीन !

रैक्वाच्या गांवीं
ब्रह्मवेत्ता तो
म्हणून कुणा
विदित नाहीं !
गाडीवानच
गांवकरी त्या
समजतात !
ते मजलागीं
म्हणूं लागले :
" गाडीहांक्याचा
जो हीन पेशा
करीत असे ,
तो ब्रह्मवेत्ता
असेल कसा ?
तप करितां
न दिसे आम्हां;
यज्ञयागही
न केले त्यानें;
शिष्यांलागून
पढविण्याची
गोष्टच काय ?
—कसा मग तो
ऋषिमुनींच्या
पावेल पदा ? "

**जानश्रुति :**

दूता, मज ये
लोकांची कींव !
गाडीवानही
ब्रह्मवेत्ता कां
नच होईल ?
ओंगळ रूप,
ओंगळ वेष,
ओंगळ पेशा
—यांत असेल

रैक्व मुनीनें
उंची आपली
दडवलेली !
परि ती काय
नको आपणा
उमगावया ?

दोन पुण्यात्मे
हंसरूपानें
होते उडत
नभीं एकदां.
संवाद त्यांचा
ऐकून मला
झाली विदित
रैक्व–महति !
–पुण्यात्मे वृथा
वदति कसे ?

जा तूं, उद्यांची
करा सिध्दता:
सहाशें गाई,
सोन्याचा कंठा,
चंदनी रथ
अश्वतरीचा
–हा नजराणा
घेऊन जाऊं
रैक्व-दर्शना
उद्यां पहाटे.
होवो या पुढें

रैक्वाचें गांव
'रैक्वपर्ण' या
नामें विश्रुत !

## विनवणी

अंतर्यामीं माझ्या सौंदर्य असून
कुरूपता जगीं कां येई दिसून ? १
काय कुरूपता अटळ जगांत ?

—किंवा दोष आहे मानवी दृष्टींत ? २
कांहीं असो ; मज कुरूपता दिसे ,
अंत: सौंदर्यास हें साजेसें नसे ! ३
आंतर सौंदर्या ! स्फुरण पावशी
'सुंदर कांहींसें' दिसतां मजशीं ! ४
म्हणून तें मातें वाटतें सुंदर :
सौंदर्याचा असा होतो साक्षात्कार ! ५
आतां हीच एक माझी विनवणी :
अखंड स्फुरण पाव तूं मन्मनीं ! ६
कुरूप तें मग सुरूप होईल,
—कुरूप —सुरूप द्वंद्वच नुरेल ! ७
तीच अनुभूति यावयाकारणें
तिळ तिळ नित्य झुरतों झुरणें ! ८

## स्वप्नदर्शन

असशी तशी हुबेहूब तूं स्वप्नीं दिसाया
स्वप्नदर्शन बहु रंगांचें हवें व्हावया.
काळ्या – पांढऱ्या दोनच रंगीं स्वप्न दिसत,
सुंदरतेची छटा नि छटा कशी ये त्यांत ? १

स्वप्नदशन बहु रंगांचें नसो नसलें,

पुरें मज तें दोन रंगांचें जरी असलें !
काळ्या – पांढऱ्या रंगांमधलें छायाचित्रही
वियोगामधें दिलासा न कां जीवास देई ? २

## शेले

शेले, कैक नारी आल्या तुझ्या जीवनांत:
देह-मन–बुध्दि यांचें सौंदर्य त्यांच्यांत–
भासमान तुला झालें प्रथम प्रथम,
परि तुझा सत्वरच लया गेला भ्रम !
जरी होत्या त्या अवघ्या सुंदर देहानें,
परि तशा नव्हत्या त्या मनानें-बुध्दीनें !
याकारणें आजन्म तूं केलें 'हाय ! – हाय !'
बाळगतां भ्रम दुजें व्हावयाचें काय ? १

हें त्रिविध सौंदर्य तूं आदर्श मानिशी,
त्यांत दिव्य सौंदर्याचें बिंब विलोकिशी !
वाटे तुला: हें आदर्श सौंदर्य पूजितां
होतें दिव्य सौंदर्याचें पूजन तत्त्वता !
ज्या नारींत हें त्रिविध आदर्श सौंदर्य–
एकवटे, तिचा शोध झाला अनिवार्य !
परि अशी एकही न नार गवसली,

भ्रमरता मात्र लोकां तुझ्यांत दिसली ! २

महाकवे ! तुजलागीं विशुद्ध प्रीतीची
जादुगिरी कळून न आली नवलाची !–
शुद्ध प्रीति हृदयांत होतांच उदित
नर-नारी-जनां निज प्रीतिविषयांत—
आदर्शच काय, परि दिव्य सौंदर्यही
भासूनिया जीविताची सफलता होई !
अनुभूति ही तुजला यावयाच्या आधीं
एकाएकीं सागरांत मिळाली समाधि ! ३

## अंतरींचा दिवा

घरांतला दिवा गेला विझून
ताऱ्याचा प्रकाश न ये दुरून ! १
अंतरींचा दिवा लागल्यावीण
प्रकाश मिळेल मज कुठून ? २
वाढताहे रात्र एकसारखी ,
एकसारखीच वाढे काळोखी ! ३
अंतरींच्या दीपा ! तुजवांचून
कवणास आतां जाऊं शरण ? ४
पेटूं दे रे तुझी सत्वर ज्योत,

उजळूं दे तिनें अंधारी रात ! ५
द्युतीवीण गेली रात्र सगळी
—नको , नको असें व्हायला मुळीं ! ६

## कबीराचा शेला

कबीर बसला हातमागावर
शेला विणी झरझर. १
शेल्यामधें धागे उभे नि आडवे
गोंवियेले एकीभावें : २
होते उभे धागे अवघे रामाचे ,
आडवे ते रहीमचे ! ३
नवीन विणीचा अभिनव शेला
कबिरानें निर्मियेला ! ४
चव्हाट्यावरतीं पाल उभारून
शेला ठेवी तो मांडून. ५
परि शेला घ्याया गिऱ्हाईक कुणी
कसा नच मिळे जनीं ! ६

# आकाशापैकीं

## १

" नभ दिव्यतेनें आहे भरलेलें
— कोण हें नाकारी ?
अफाट विस्तार , अद्भुत नीलिमा
आणि लक्षावधी झगमग ज्योती
— हीं अंगें - उपांगें आहेत नभाच्या —
दिव्यतागुणाचीं .

" नभाची दिव्यता आपणा सर्वांच्या
आवाक्याबाहेर !
नभ आहे दूर — कल्पनेच्या पार —
दिव्यता तयाची लांबून पहावी
आणि वाखाणावी !
ती कधीं आपल्या हातीं न येईल —
साध्य न होईल !

" निवास आपला धूलिधूसरित
धरेवर आहे !
धूलीवीण काय दुसरें आपल्या
माळीं असायचें ? "

## २

" वैफल्य–भावना कशाला आपल्या
उरीं बाळगिशी ?
' धूलिधूसरित ' तूं जिला म्हणशी ,
ती धरा आपली आहे खरोखर
आकाशापैकींच !

" निशीथीं नभांत नेत्रीं दिसणाऱ्या
स्वर्गंगेंत असे
निज सूर्यमाला आणि वसुंधरा
–तूं आणिक मीही ! —
नभाहून मग कसें आपणास
वेगळें मानिशी ?
—नभाची दिव्यता न कां तुझी–माझी ?

" दीप्त ताऱ्यांहून विझल्या ग्रहाचा
—आणि त्यावरतीं वास करणाऱ्या
तुझ्या–माझ्यासह सर्व मानवांचा—
कार्यभाग मात्र आहे भिन्न भिन्न !
—इतकाच असे भेद उभयांत ! "

## काळा–गोरा

दिवसाचा गोरा सायंप्रकाशांत
रात्रीच्या काळ्याशीं मिळवितो हात —
सरतां धरेचा — अधिवास त्याचा — चार प्रहरांचा ! १
निशीथींचा काळा उषाप्रकाशांत
दिनींच्या गोऱ्याशीं मिळवितो हात—
सरतां धरेचा— अधिवास त्याचा— चार प्रहरांचा ! २
निसर्गामधील काळा आणि गोरा
यापरी वाटून घेती वसुंधरा !
त्यांच्यामधें कांहीं—भेदभाव नाहीं—जसे भाईभाई ! ३

## प्लेटोची गुहा

आहें मी मनानें प्लेटोच्या गुहेंत बद्ध अवस्थेंत :
सांवल्यांवाचून तींत दुजें कांहीं दिसून न येई !
कशाच्या सांवल्या ? –याची जाणीवही मला मुळीं नाहीं !
नित्य सांवल्यांतें पाहून पाहून भ्रमे माझें मनः
'सांवल्याच सत्य, बाकी सारें खोटें !–' ऐसें मज वाटे ! १

असेल खचित सांवल्यांच्या मेळीं माझीही सांवली
माझ्या सांवलीतें मी सत्य मानतों, तिचा ध्यास घेतों !

आणि स्वतांलागीं मिथ्या समजतों, साफ विसरतों !
याहून दुसरें काय विपरीत व्हायचें प्रतीत?
गुहेंतला माझा वास मनोमन सर्वांस कारण ! २

कधीं मुरडेल गुहेच्यापासून हें दुबळें मन ?
कधीं तटातट बंधनें तुटून विमुक्त होईन?
त्यावांचून माझें सांवल्यांचें पिसें सरायचें कसें ?
जातां सांवल्यांच्या मूळ आधाराशीं सत्य कळायासी
ओळख पुरती पटेल जगाची ! —तशीच स्वतांची !– ३

## कवच

"आघात सोसण्याचें कवच तूं कोणतें
मानिशी मनोमन ! –" पुसशी मित्रा ! मातें. १
सांगतों तुजलागीं प्रचीतिं नवलाची :
कळेल मग तुला ठेवण मन्मनाची. २

एकदां झाला थोर आघात मनावर ,
त्या दिनीं सायंकाळीं फिराया गेलों दूर. ३
–खराच योगायोग !– नेमका त्या वेळेला
हो रंग–महोत्सव पश्चिम दिग्भागाला ! ४
सोनेरी रंगामधें कुसुंबी छटा मिळे ,
न्यारीच शोभा आली गडदपणामुळें ! ५

उरल्या आकाशास सुवर्ण–कांति येई
गरीब धरा तीही क्षण हो हेममयी ! ६
– अद्भुत हें सौंदर्य पाहून वृत्ति धाली,
खिन्नता अंतरींची कोठल्या कोठें गेली ! ७

सौंदर्यप्रतीतीची लालसा मानसींची
प्रेरणा नित्य देते जीवन जगण्याची ! ८
लालसा हीच होई कवच मित्रा ! माझें,
सोशितों मी धीरानें आघात होती जे जे ! ९

## कारवा

ताराविश्वांचा दिव्य कारवा अवकाशांत
चालला आहे भिरभिरत गरगरत !
कल्पना न हो त्याच्या गतीची ;
अंध, निर्घृण शक्ति तयाची !
‘ कुठें , कशाला चाललों ?–’ याची त्याची त्यालाही
जाणीव नाहीं ! १

कारव्यालागीं असून नसे मानवजात !
मग मानवी जीवनमूल्यें काय त्या होत ?
जी सुंदरता मूल्यें गणून
मानिली आहे मीं मनोमन ,

तिची कदर कारऱ्यास या नसो नसली !
-पर्वा कसली ?- २

सुंदरतेचें आराधन मीं आजन्म केलें :
तीच सत्याचें रम्य रूपडें – नित्य भाविलें !
दैवत माझें अन्य कुणाला
तुच्छ वाटतें म्हणून त्याला
त्यजून कशी भंगूं एकली जीवनांतील
वेणु सुरेल ? ३

## देवमानव

**खगोलवेत्ता :**

खगोलाचें घेऊनिया वेध भूवरून
ब्रह्मांडाचें रहस्य न होई आकलन !
वाटेः कुणी देवी मला प्रसन्न होऊन
न्यावें तिनें अंतरिक्षीं कराया भ्रमण—
ब्रह्मांडाचा तसू तसू प्रत्यक्ष पाहीन,
आदिस्त्रोत तयाचा मी शोधून काढीन;
जीविताचा हेतु तोही तेणें उमगेल,
मानवाच्या कर्तव्याची दिशा आकळेल !
— परि कसें हें घडावें ?—
अरे, ही कल्पना

सुचतांच प्रगटली कोण ही अंगना ?
गौरवर्ण, पिंगे डोळे, नाक धारदार
जशी काय पद्मालया ठाकली समोर !
कोण गे तूं ?

**खगोलविद्येची देवता :**

देवता मी खगोलविद्येची.

**खगोलवेत्ता :**

देवी, कष्ट कां घेतले ?

**खगोलविद्येची देवता :**

तुझिया मनींची
फेडावया भ्रांति आलें मी स्वर्गामधून
अंतरिक्ष – भ्रमणाची कल्पना ऐकून :
अनंत हें अंतरिक्ष, अनंत पसारा
अंतपार कसा लागे मानवा पामरा ?
आणि हेतु जीविताचा तुमच्या कळाया
ब्रह्मांडाचा आदिस्त्रोत नको उमगाया !

**खगोलवेत्ता :**

नच कळे कांहीं; देवी, मानवालागोनी
मार्ग दावी.

**खगोलविद्येची देवता :**

त्याचसाठीं आलें मी भुवनीं
ऐक नीट : विश्वबाह्य न मानव जात,
विश्वामधें ती खचित आहे अंतर्भूत.
जें तत्त्व ग्रह–ताऱ्यांत , जें तेजोमेघांत
तेंच आहे मानवांत उत्क्रांत रूपांत !
विश्वीं नसे ती ‘ जाणीव ’ वसे मानवांत
–विश्वावर मानवाची ही निःशंक मात !
ब्रह्मांडाचा आदिस्त्रोत मानवाभीतरी
कसा नसे ? –मीच आतां हें तुला विचारी !

**खगोलवेत्ता :**

—काय मग पूर्णतेस मानव पोंचला ? —
—नुरे काय करायचें कांहींही त्याजला ?—

**खगोलविद्येची देवता :**

छे, छे, आहे अपूर्णच मानव अजून,
न केलेलें किती तरी उरे केल्याहून !
जाणिवेच्या––नेणिवेच्या अतीत दशेला —
घेतां साध्य करून त्या ‘ अति जाणिवे ’ ला
मानवाचें मन मग पूर्णता वरील,
सुप्त–गुप्त शक्ति त्याच्या जाग पावतील !

विज्ञानानें सामर्थ्यांस सीमा न राहील,
सत्त्वगुणें शुभंकर सामर्थ्यें होतील !
धरालोकीं स्वर्गलोक स्वयें उतरेल,
देवपणा सहजच मानवा येईल !
— अशा 'देवमानवा'ची निर्मिती व्हावया
मानवानें आटोकाट हवें झटावया !
—हाच आहे मानवाच्या हेतु जीविताचा,
हाच आहे पंथराज त्याच्या कर्तव्याचा !
—कशासाठीं अंतरिक्षीं हवें भ्रमावया ?—
—कशासाठीं आदिस्त्रोत हवा उमगाया ?—
—हेंच गुह्य सांगावया आलें स्वर्गांतून
अंतरिक्ष–भ्रमणाची कल्पना ऐकून !
येतें आतां. —

**खगोलवेत्ता :**

एकाएकीं देवी प्रगटली,
एकाएकीं बोलूनिया परतून गेली !
दिव्य रूप अजूनही खेळतें नयनीं,
दिव्य वाणी अजूनही घुमतें श्रवणीं !

## कल्पतरूची इच्छा

वर्षा ऋतूंत धरणीवरतीं
नवे अंकुर सर्वत्र फुटती. १

कल्पतरूच्या जेव्हां हें ये ध्यानीं,
बेचैन होई तो नंदनवनीं ! २

म्हणे, " मातीची धरा ही असतां
केवढी तिची सर्जनशीलता ! ३

वाटे : सोडावें नंदनवनास,
धरेवरतीं करावा निवास- ४

तिच्यामधून मी रस शोषीन,
त्यावरी माझें होईल पोषण. ५

झडेल सारी पालवी शिशिरीं,
फुटेल परि वसंतीं दुसरी. ६

कालांतरानें जाईन वठून
माती होऊन मातींत मिळेन ! ७

नंदनवनीं मरण कोठूनी ?
मरणावीण अर्थ न जीवनीं ! " ८

## मूर्तिकार असतों तर —

असतों मी जर    मूर्ति–शिल्प–कार —
संगमरवरी    एका शिळेवर    १
खोदल्या असल्या    भिन्न मूर्ति दोन :
एक समोरून    दुसरी मागून.    २
मानवी सांगाडा    पुढून खोदून
असतें त्या दिलें    ‘ मृत्यु ’ अभिधान !    ३
खोदला असता    उलट बाजूनें
प्रसन्न युवक    ‘ प्रेम ’ या नांवानें !    ४
मात्र पुढलीच    दर्शनी बाजू मीं
ठेवली असती    जनांत नेहमीं !    ५
परि कुणी कुणी    असतें पाहिलें
जिज्ञासा वाटून    शिल्पही मागलें !    ६
कळलें असतें    तयां आपोआप
मृत्यूचेंच आहे    प्रेम दुजें रूप !    ७

## गाभाऱ्यांत

गाभाऱ्यांत अंधकार असूं दे असला ! ध्रु०
गाभाऱ्याच्या अंधारांत
नीट कांहीं न दिसत !

परि मूर्ति आहे—नाहीं संशय कशाला ? १
गाभाऱ्यांत मूर्ति वसे
विश्वास हा जरी असे,
नच दिसो न दिसे ती तुझ्या लोचनांला ! २
नको करूं अनमान,
पत्र —पुष्प दे वाहून
निःशंक तें पोंचणार आहे ज्याचें त्याला ! ३
पत्र—पुष्प न वाहिशी,
येशी तसा जरी जाशी
आगमना मग तुझ्या हेतूच नुरला ! ४

## रोम नगरींत

रोम नगरींत
भव्य दालनांत
सोहळा जाहला,
जगा मानवला !

वर्णभेदाप्रती
द्याया मूठमाती
विभिन्न देशांच्या,
विभिन्न वर्णांच्या

तेरा ख्रिस्ती जनां
चरणक्षालना
रोमला पोपनें
आणिलें प्रेमानें.
गौर युरोपीय,
श्याम भारतीय,
जपानी पिंवळा,
निग्रो कुट्टकाळा
—होते त्यांत सारे

भेदभाव नुरे !

प्रेक्षक अमित
होते दालनांत.
पोप येतांक्षणीं
सर्वांनीं उठूनी
शिरें लववून
दिलें उत्थापन.
वृद्ध पोप जॉन
हात उभारून
सकलां सस्मित
आशीर्वाद देत.
आदरभावानें
प्रेक्षक उभ्यानें
पाहती सगळा
सोज्ज्वल सोहळा.

तेरा जणांतला
निग्रो ख्रिस्ती काळा
आधीं पाचारिला,
आधीं गौरविला :
उजवा चरण
तयाचा धुऊन
कटीच्या वस्त्रानें
पुसून पोपनें
थोडा उंच केला,
आदरें चुंबिला !
—असेच उरले
तेही गौरविले.
होता अखेरचा
पुत्र भारताचा !

सोहळा पाहून
प्रेक्षकांमधून
हुंदके उठती,
दबले न जाती !
अनेकांचे डोळे
आंसवें भरले !

नभोवाणीवर
वार्ता जगभर
प्रक्षेपित झाली,
वृत्तपत्रीं आली.
ऐकून, वाचून

सर्वां समाधान!
—यापरी सोहळा
जगा मानवला!

## नटराज

मूर्तींमधल्या नटराजाचा पद दक्षिण
स्थित खालतीं, परि उत्क्षिप्त वाम चरण.
तांडव नृत्य असलें तरी पाषाणामुळें
राही चरण वरचा वरी, खालचा खालें! १

क्षणभर जो पदविक्षेप रहावयाचा—
तो इथें होई त्या क्षणासह बद्ध सदाचा!
हीच नव्हे कां चिरंतनता?—किती विचित्र!—
मर्त्य मानवा ती साध्य होत कलेंत मात्र! २

अनुक्रम ... ३३८३८ वि: काव्य
क्रमांक ... १५६६ नों दि ... १३-११-८२

# टीपा

[लेखकाचा हा चौथा काव्यसंग्रह. यांतील पहिल्या चार कविता विद्यार्थि-दशेंतील व पूर्वी प्रसिद्ध झालेल्या असून येथें त्या परिष्कृत स्वरूपांत दिल्या आहेत. ‘ तोच गीत ऐकितो ! ’ कविता ‘ आराधने ’च्या चौथ्या आवृत्तींतून वगळल्यानें येथें घेतली आहे. इतर कविता वेळोवेळीं लिहिलेल्या असून सर्व कविता कालानुक्रमानें दिल्या आहेत. १९२० ते १९६० या कालखंडांतील या कविता आहेत.

क्रमांक १ ते ५, १० ते १२ व ३७ या ९ कविता पूर्वी प्रसिद्ध झाल्या असून उरलेल्या ५१ कविता प्रथमच प्रसिद्ध होत आहेत. ]

## ( अ ) स्पष्टीकरणात्मक

**रूपगर्विता**—ग्रीक पुराणांतील नार्सिससूच्या कथेवरून या उपरोधिक कवितेची कल्पना सुचली.

**पुंजीवाद्यांच्या देशांत**—ही कविता कोणत्याहि देशाला उद्देशून नसून काल्पनिक आहे.

**अग्निमंदिर**—मुंबईच्या पारशांच्या अग्यारींत लेखक गेला होता, तेथलें हें वर्णन आहे. मोबिद–पुजारी.

**बलिदान**—इ. स. च्या सातव्या शतकांतील मदुरेचा पांड्य राजा नेदुमारन् यानें शैव साधु संबंदर व राणी मंगयर्करसि यांच्यामुळें जैन धर्म सोडून शैव धर्म स्वीकारला. शैव न झाल्याबद्दल त्यानें आठ हजार जैनांचा अमानुष संहार केला ! वैगाई–मदुरेची नदी. कमल सर–सुवर्णपुष्करणीचें जुनें नांव.

**मातरिश्वा**—यानें मानवासाठीं अग्नि आणल्याचा ऋग्वेदांत [ १· १२८·२ ] उडता उल्लेख आहे. तेवढ्या आधारावर कल्पनेनें हें स्तोत्र (Ode) लिहिलें आहे. ऋभूंचाहि ऋग्वेदादिकांत उल्लेख येतो. ऋभु तीन. ते प्रथम मानव असून तपानें अमर–पर्यायानें–देव झाले.

**पिकासोचें कबूतर**—जगद्विख्यात चित्रकार पिकासो यांनीं उडत्या कबुतराचें शांतिदूत म्हणून काढलेलें चित्र पाहून ही कविता लिहिली आहे.

**दडवलेली उंची**—छांदोग्योपनिषद्, ४-१,२ यावरून हें चिमुकलें नाट्यकाव्य लिहिलें.

**स्वप्नदर्शन**—स्वप्नांत स्वतांचें तोंड दिसत नाहीं [ पा. १ वरील 'मार्गप्रतीक्षा' कडवें ५ ], तद्वत्, त्यांत दिसणाऱ्या वस्तु मूळच्या विविध रंगांत न दिसतां काळ्या-पांढऱ्या रंगांत दिसतात, असा लेखकाप्रमाणें वाचकांचाहि अनुभव असेल.

**प्लेटोची गुहा**—प्लेटोचें ' रिपब्लिक ', प्रकरण ७, यांत केवळ पडछाया अगर सांवल्या दिसणाऱ्या गुहेचें काल्पनिक वर्णन आलें आहे. त्या गुहेचा प्रतीक म्हणून या कवितेंत उपयोग केला आहे.

**कारवा**—अमेरिकेंतील मौंट पालोमारच्या वेधशाळेनें घेतलेल्या छाया-चित्रांवरून अंतरिक्षांत अति दूर दोन प्रचंड ताराविश्वांची टक्कर झाल्याचा शोध खगोलवेत्त्यांनीं १९५९ मध्यें जाहीर केला. विस्मय व भय उत्पन्न करणाऱ्या या शोधाबद्दलची लेखकाची तात्कालिक प्रतिक्रिया म्हणजे ही कविता होय. सदर टकरीचें छायाचित्र डॉ. लिटलटन यांच्या 'Man's view of the Universe' या ताज्या ग्रंथांतहि आढळेल. ताराविश्व--( Galaxy ). आपली आकाशगंगा ताराविश्वच आहे.

**देवमानव** ( God-man )—' कारवा ' लिहिल्यानंतर लौकरच, पण निराळ्या वृत्तींत हें छोटें नाट्यकाव्य लिहिलें. लेखक पूर्वीपासून खगोलविद्येचा नम्र विद्यार्थि असून यावेळीं त्याचें मन त्यांत विशेष गढल्यानें या नाट्यकाव्यांत ' खगोलवेत्ता ' व ' खगोलविद्येची देवता ' हीं पात्रें सहजगत्या आलीं. ' अति जाणीव '–Supra-Conscious.

**रोम नगरींत**—रोम येथें पोप जॉन २३ वे यांनीं ता. १४-४-१९६० रोजीं सर्व वर्णांच्या तेरा अनुयायांचे पाय धुतले. ख्रिस्तानें अखेरच्या जेवणापूर्वी बारा शिष्यांचे पाय धुतले होते. सहाव्या शतकांत पोप सेंट ग्रेगरी यानें बारा

भिकाऱ्यांचे पाय धुतले; तेरावा भिकारी आपली पाळी येण्याची वाट पहात होता, तो प्रत्यक्ष खिस्त समजतात !

मात्र सर्व वर्णांच्या अनुयायांचे पाय धुणारे पोप जॉन पहिलेच होत. या समारंभांत भारतीय अनुयायाचा तेरावा–खिस्ताचा–क्रम लागला, हें लक्षणीय आहे.

## ( आ ) छंदोविषयक

क्रमांक १ ते ३, ५, ९ [ पहिलीं दोन मुक्तकें ], १६, २१, ३१ व ३६ या कविता जातींत आणि उरलेल्या छंदांत आहेत. परिचित जाति व छंद यांची माहिती ग्रंथांतरीं आढळणारी असल्यानें येथें दिली नाहीं.

कांहीं प्रयोग असे : क्र. १० व ११ यांत सयमक मुक्तओंवी व क्र. ८ मध्यें निर्यमक मुक्तओंवी आहे. मुक्तओंवीच्या माहितीसाठीं लेखकाचें ‘ विमर्शिनी ’ पुस्तक पहावें. क्र. ३७ मधील मुक्तछंदांत मुख्य आवर्तनें ४ अक्षरी असून मधून-मधून चरणांतीं २ अक्षरी आवर्तनें येतात. क्र. ५० मधील मुक्तछंद ६ अक्षरी असून ‘ आराधनें ’त तो आला आहे. क्र. २४ मध्यें शिथिल पादाकुलक छंद आहे.

इतर प्रयोगांत कुठें त्याच अक्षरसंख्येचीं, तर कुठें संमिश्र अक्षरसंख्यांचीं आवर्तनें येतात. क्र. २६ मध्यें ४ अक्षरी, क्र. १४ व ५४ यांमध्यें ५ अक्षरी, पण भिन्न रीतीनें आणि क्र. ३३ व ५१ यांमध्यें ६ अक्षरी, पण भिन्न रीतीनें आवर्तनें येतात. क्र. ५४ मध्यें पद्यबंध ( Stanza ) आला आहे. क्र. ५६ मध्यें ५ व ६ अक्षरी, क्र. ४३ मध्यें ६ व ७ अक्षरी आणि क्र. ४९ मध्यें ६ व ८ अक्षरी आवर्तनें आहेत. क्र. १९ मध्यें कडव्यांतील तीन चरण ६ अक्षरी आवर्तनांचे व चौथा चरण लवंगलता छंदाचा आहे. या विवेचनांत आवर्तनांची फक्त अक्षरसंख्या दर्शविली असून प्रतिचरणीं आवर्तनें किती व कुठें येतात, हें दर्शविलें नाहीं. हा तपशील त्या त्या स्थळीं जिज्ञासूंनीं पहावा.

क्र. १२ व २७ यांत लहान-मोठ्या चरणांची उलटापालट झाली आहे. लहान चरण ६ व मोठा १४ अक्षरी आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १२६४०

REFBK-0012750
REFBK-0012750

मूल्य रु. ३·००

## वामन नारायण देशपांडे यांचीं पुस्तकें

**काव्य :**
- आराधना
- अनामिका
- कोरकू
- पिकासोचें कबूतर

**समीक्षा :**
- रामशास्त्री
- विचारसमीक्षा
- विमर्शिनी

**संशोधन :**
- आद्य मराठी कवयित्री
- स्मृतिस्थळ

**इतर :**
- लघुरामायण

व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ : पुणें २